## आंबा पीक सल्ला

योगेश परुळेकर, डॉ. विजयकुमार दळवी

विविध भागांमध्ये या वर्षी नोव्हेंबर महिन्यात हापूस आंबा बागेत मोहर येण्यास सुरवात झाली. डिसेंबर महिन्यामध्ये बहुतांशी बागा मोहर फुटणाऱ्या अवस्थेपासून फळवाढीच्या अवस्थेमध्ये आहेत.

### नवीन लागवड

- नवीन लागवड केलेल्या कलमांना आठवड्यातून दोन वेळा पाणी द्यावे.
- पाण्याचे बाष्पीभवन टाळण्यासाठी आळ्यामध्ये सुक्या गवताचे किंवा पालापाचोळ्याचे आच्छादन करावे.
- प्रत्येक कलमास २५ ग्रॅम युरिया आणि २५ ग्रॅम १५:१५:१५ या खताची मात्रा द्यावी. ही खते कलमाच्या आळ्यामध्ये बांगडी पद्धतीने द्यावीत.
- झाडाला नवीन पालवी येत असल्यास तिचे करपा रोग तसेच शेंडा पोखरणाऱ्या अळीपासून संरक्षण करण्यासाठी डायमेथोएट (३० टक्के प्रवाही) १० मि.लि. आणि कार्बेन्डाझिम (१२ टक्के) + मॅन्कोझेब (६३ टक्के) हे संयुक्त बुरशीनाशक १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.


शेंडा पोखरणाऱ्या अळीचा प्रादुर्भाव

**कीडनाशके संजीवके वापरासंबंधी**

▸ खरेदीवेळी पक्के बिल घ्यावे. ▸ बॅन किंवा 'रेस्ट्रिक्टेड' आहे का पाहावे. ▸ लेबल क्लेम वाचावेत. ▸ पुरेशा ज्ञानाशिवाय रसायने एकमेकांत मिसळू नयेत. ▸ रसायनांचा गट तपासावा. ▸ पीएचआय, एमआरएल तपासावेत. ▸ तज्ज्ञांचा सल्ला अवश्य घ्यावा.

### मोहरलेल्या बागा

- दररोज सकाळी मोहराचे काळजीपूर्वक निरीक्षण करून त्यावर तुडतुडे, फुलकिडे तसेच मोहर अथवा फळे पोखरणारी अळी यांचा प्रादुर्भाव आहे का ते पाहावे. प्रादुर्भाव अत्यंत कमी प्रमाणात असल्यास किंवा दिसून येत नसल्यास कीटकनाशकांची अनावश्यक फवारणी टाळावी. कारण अशा फवारण्यांमध्ये परागीभवन करणाऱ्या कीटकांवर परिणाम होऊन त्याचा फळधारणेवर विपरीत परिणाम होण्याची दाट शक्यता असते.
- मात्र मोहरावर विशेषतः तुडतुडे किंवा फुलकिडे यांच्या विविध अवस्था दिसत असल्यास तातडीने नियंत्रणासाठी कीडनाशकांची फवारणी करावी. अशावेळी फवारणी करण्यास एक-दोन दिवसांनीचा जरी उशीर झाला आणि वातावरण ढगाळ असल्यास किडींची संख्या झपाट्याने वाढून त्यांचा प्रादुर्भाव आटोक्यात आणणे अशक्य होते, त्यामुळे मोठे नुकसान होण्याची शक्यता असते.
- तुडतुडे किंवा फुलकिडी आणि भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास इमिडाक्लोप्रीड (१७.८ टक्के प्रवाही) ३ मि.लि. अधिक हेक्झाकोनॅझोल (५ टक्के) ५ मि.लि.प्रति १० लिटर पाण्यात मिसळावे. या अगोदरच्या फवारणीमध्ये इमिडाक्लोप्रीड हे कीटकनाशक वापरले असल्यास त्याऐवजी थायामेथोक्झाम (२५ टक्के दाणेदार) १ ग्रॅम प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात वापर करावा. एकाच कीटकनाशकाचा पुन्हा पुन्हा वापर करणे टाळावे.


फुलकिडीचा प्रादुर्भाव


तुडतुड्यांचा प्रादुर्भाव

- ज्या बागांमध्ये फळे वाटाण्याच्या आकाराएवढी दिसत आहेत, अशा बागांमध्ये प्रतिझाड १५० ते २०० लिटर पाणी द्यावे. पंधरा दिवसांच्या अंतराने पुन्हा पाणी द्यावे.
- ज्या बागांमध्ये फळे वाटाणा, सुपारी अथवा अंडाकृती आकाराची झालेली आहेत अशा बागांमध्ये पोटॅशियम नायट्रेट या पाण्यात विरघळणाऱ्या खताच्या एक टक्का तीव्रतेच्या द्रावणाची (१०० ग्रॅम पोटॅशियम नायट्रेट प्रति १० लिटर पाणी) फवारणी करावी. फळे वाटाणा, सुपारी तसेच अंडाकृती आकाराची असताना प्रत्येकी एक याप्रमाणे एकूण तीन फवारण्या कराव्यात.
- ज्या बागांमधील मोहर फुलून सुकण्याच्या अवस्थेमध्ये आहे, अशा झाडांच्या फांद्या दुपारच्या वेळी हलवून घ्याव्यात, त्यामुळे मोहरावरील सुकलेली फळे गळून पडतील. मोहराचे दांडे स्वच्छ झाल्यामुळे बुरशी व कीटकांचा प्रादुर्भाव कमी होण्यास मदत होईल.
- ज्या बागांमधील फळे सुपारी ते अंडाकृती या आकाराची असतील अशा फळांना वर्तमानपत्राच्या २५ सें.मी. × २० सें.मी. आकाराच्या पिशव्या घालाव्यात. अशा पिशव्या स्टेपलरच्या साह्याने तयार करून त्या स्टेपलरच्या साह्याने फळांवर घालाव्यात. फळांना पिशवी लावण्यापूर्वी प्रत्येक पिशवीस पंचिंग मशिनच्या साह्याने चार छिद्रे पाडावीत. अशाप्रकारच्या पिशव्या घातल्याने फळे डागविरहीत तसेच आकर्षक राहतात. तसेच त्यांचे वजन वाढण्यास मदत होते असे दिसून आले आहे.


**आंबा फळांना वर्तमानपत्राच्या २५ सें. मी. × २० सें.मी. आकाराच्या पिशव्या घालाव्यात.**

टीप- निर्यातक्षम आंबा बागेत शास्त्रज्ञांचा सल्ला घेऊन पीक संरक्षण व्यवस्थापन करावे. निर्यातीला संमत कीडनाशकांचा वापर करावा.

: योगेश परुळेकर : ८२७५४५४९७८, (डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली,जि.रत्नागिरी )

## कुक्कुटपालन सल्ला

डॉ. राहुल सूर्यवंशी, डॉ. विकास वासकर

- कुक्कुटपालन शेडचा परिसर सुरक्षित करावा; प्रदेशमार्गावर प्रतिबंधित सूचना पट्ट्या लावाव्यात.
- शेडजवळ कुठल्याही प्रकारची झाडे नसावीत, जेणेकरून पक्षांच्या बसण्यास जागा उपलब्ध होणार नाही.
- अनिवार्य कामे, प्रतिबंधित प्रवेश तसेच प्रवेश यांचे रेकॉर्ड ठेवावे.
- पोल्ट्री फार्मच्या दरवाजास कुलूप असावे, तसेच आत असल्यास दरवाजा आतून बंद करून ठेवावा.
- प्रत्येक शेडच्या स्टाफ व आगंतुकांसाठी बूट व ॲप्रनची उपलब्धता असावी.
- स्टाफने प्रत्येक शेडमध्ये प्रवेश करताना योग्य बूट व ॲप्रनचा वापर करावा.
- कोंबड्यांची देखभाल करताना फार्मच्या बाहेर वापरायचे बूट व ड्रेस वेगळे ठेवावेत.
- कोंबड्यांची देखभाल करून परिसराच्या बाहेर जाताना अगोदर संपूर्ण कपडे बदलावेत. हात स्वच्छ धुवावेत.
- कोंबड्यांच्या संपर्कात राहणाऱ्या व्यक्तींनी इतर पोल्ट्री फार्मला भेट देऊ नये.शक्य असल्यास आगंतुकांसाठी कोंबड्या पाहण्याची बाहेरून वेगळी व्यवस्था असावी.
- मेलेल्या कोंबड्यांची सुयोग्य विल्हेवाट लावावी.
- कोंबड्यांची ने-आण करण्यासाठी किंवा खाद्य आणण्यासाठी परिसरात येणाऱ्या वाहनाची स्वच्छता ठेवावी. वाहनांवर जंतुनाशकांची फवारणी करावी.


**कोंबड्यांच्या आरोग्यासाठी शेड आणि परिसराची स्वच्छता महत्त्वाची आहे.**

- रोगकारक घटकांच्या नियंत्रणासाठी स्वच्छता कार्यक्रम राबवावा.
- कोंबड्यांची खाद्य ठेवण्याच्या जागेची नियमित स्वच्छता करण्यात यावी, वन्य प्राणी (उंदीर, पक्षी, किडे) वा पाळीव प्राणी (कुत्रे, मांजरी) यांचा शेडच्या परिसरातील प्रवेश निषिद्ध असावा.
- वैद्यकाच्या मदतीने नियमित लसीकरण करावे. आपली जैवसुरक्षा व सामूहिक स्वास्थ्य कार्यक्रमाची योजना व त्याच्या अंमलबजावणीची तपासणी करावी.

### जैवसुरक्षेबाबतचे प्रमुख मुद्दे

- कोंबड्यांपर्यंत पोहोचण्यास प्रतिबंध.
- कुक्कुट शेड स्तरावर येण्या-जाण्यास प्रतिबंध.
- फार्म क्षेत्रात वाहन आणण्यास प्रतिबंध.
- आगंतुकावर प्रतिबंध.
- शेडवर बाहेरील कामगारांवर प्रतिबंध.
- शेडजवळ रोगसंक्रमणास कारणीभूत ठरणाऱ्या वाहनांवर प्रतिबंध. बहु प्रजाती पालन करताना काळजी घ्यावी.
- नव्या कोंबड्यांचे योग्य व्यवस्थापन ठेवावे.
- परिसरात कायम स्वच्छता असावी.
- फार्मवरील उपकरणांची स्वच्छता व निर्जंतुकीकरण करावे.
- कोंबड्यांच्या खाद्याची गुणवत्ता महत्वाची आहे.
- वैयक्तिक स्वच्छता, शिल्लक राहिलेल्या कोंबडी खाद्याची योग्य विल्हेवाट लावावी.
- मृत कोंबड्यांची तातडीने विल्हेवाट लावावी, खाद्य सुरक्षा ठेवावी.
- एकसमान वयवर्गाच्या कोंबड्यांचे पालन करावे.
- कोंबड्यांवरील उपचार/लसीकरण नियोजनानुसारच करावे.
- अत्यंत जोखमीच्या स्थितीच्या हाताळणीसाठी संपूर्ण माहितीची नोंद ठेवावी.

: डॉ. राहुल सूर्यवंशी, ९६७३०२४०९१
(पशुवैद्यकीय सामूहिक स्वास्थ्य विभाग,
पशुवैद्यकीय व पशुविज्ञान महाविद्यालय, उदगीर, जि. लातूर)

■ वर्ष : १२, अंक : २६० ■ मुख्य संपादक : श्रीराम जयसिंगराव पवार ■ मुद्रक, प्रकाशक व *संपादक : आदिनाथ दत्तात्रय चव्हाण ■ हे दैनिक सकाळ पेपर्स प्रा. लिमिटेडसाठी मुद्रक आणि प्रकाशक आदिनाथ दत्तात्रय चव्हाण यांनी १) सकाळ प्रिंटिंग प्रेस, स. क्र. १५९/१६०, पुणे-सासवड रोड, लक्ष्मण वजनकाट्यामागे, उरुळी देवाची, पुणे - ४१२ ३०८, २) सकाळ प्रिंटिंग प्रेस, प्लॉट नं. ४२ बी, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, पिन -४०० ६१४, ३) सकाळ प्रिंटिंग प्रेस, डी - ४, एम.आय.डी.सी., शिरोली, कोल्हापूर - ४१६ १२२, ४) सकाळ पेपर्स प्रा. लिमिटेडद्वारा, विकास प्रिंटिंग अँड कॅरिअर्स प्रा. लि., प्लॉट नं. ३२, एम.आय.डी.सी., सातपूर - त्र्यंबक रोड, नाशिक - ४२२ ००७, ५) सकाळ पेपर्स प्रा. लिमिटेड, प्लॉट नं. सी - ३, एम.आय.डी.सी. एरिया, टेलिफोन एक्स्चेंजजवळ, औरंगाबाद रोड, जळगाव - ४२५ ००३, ६) सकाळ पेपर्स प्रा. लिमिटेड, प्लॉट नं. ए - ११७, शेंद्रा फाइव्ह स्टार इंडस्ट्रियल एरिया, औरंगाबाद - ४३१ ००७, ७) सकाळ पेपर्स प्रा. लिमिटेड, प्लॉट नं. ए १९/३, एम.आय.डी.सी., चिंचोली, सोलापूर - ४१३ २५५, ८) सकाळ पेपर्स प्रा. लिमिटेड, बी - ३२/३३, एम.आय.डी.सी., हिंगणा, नागपूर - ४४० ०१६, ९) सकाळ पेपर्स प्रा. लिमिटेड, प्लॉट नं. ए/६/३/२, आरटीओ ऑफिसजवळ, एमआयडीसी धनेगाव, नांदेड ४३१६०३, १०) सकाळ पेपर्स प्रा. लिमिटेड, प्लॉट नं. पी ४६, एमआयडीसी फेज ४, यवत रोड, शिवणी, अकोला ४४४००२ येथे मुद्रित केले व सकाळ पेपर्स प्रा. लिमिटेड, ५९५, बुधवार पेठ, पुणे ४११ ००२ येथे प्रकाशित केले. ■ 'ॲग्रोवन'मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. (*पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी)

पत्रव्यवहाराचा पत्ता : ॲग्रोवन, सकाळ पेपर्स प्रा. लि. ५९५, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ ■ दूरध्वनी : ०२०/२४४०५५००/ ६६०३५५०० ■ फॅक्स : २४४०५७५८ ■ e-mail : agrowon@esakal.com



© Copyrights Agrowon - All rights reserved. Click on pin to view more options. Powered By: ePaperGallery of MyVishwa